जावक क्र.सं.गो.पै.प्र. ५०९

दिनांक : / /

दिनांक : २४/०८/२०१६

## : जाहिर प्रगटण :

या जाहिर प्रगटणाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या गोठा परिसरामध्ये गोठयाच्या पत्री शेडवर व परिसरात वाढलेला फांद्या वादळी वा-याने मोडून पत्र्याच्या शेडवर पडतात व शेडचे नुकसान होते. भविष्यात यामुळे होणारे नुकसान व शेडमध्ये असलेल्या जनावरांची जिवित हानी टाळण्यासाठी शेडच्या ऊंची पासून अंदाजे पांच फुट जास्त ऊंची ठेऊन या पेक्षा जास्त ऊंचीच्या फांद्यांचा भाग तोडणे व विक्री जाहिर लिलाव प्रक्रियेव्दारे करावयाची आहे. यामध्ये रेन ट्री ८५ व गुलमोहर इत्यादि ६ झाडांच्या फांदयाचा सामावेश आहे. तरी इच्छूक असलेल्या जनतेनी दिनांक **१४/०९/२०१६ रोजी सकाळी** १०.०० वाजता या कार्यालयाच्या प्रक्षेत्रावर हजर राहावे.

**जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे असतील**

१. विक्रीस असलेल्या फांद्या प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर आल्यावर पाहवयास मिळतील.
२. लिलावात भाग घेणा-या बोली बोलणा-या व्यक्तीस प्रथम रु. २,०००/- (अक्षरी दोन हजार फक्त) अनामत रक्कम भरावी लागेल व त्याची पावती लिलाव अधिका-याकडून मिळेल. अनामत रक्कम भरल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
३. बोलीची किंमत कमी आहे असे वाटल्यास त्या फांद्यांचा फेर लिलाव करण्यात येईल किंवा अपेक्षेप्रमाणे किंमत न आल्यास फांद्यांचा लिलाव रद्द करणे इत्यादी अधिकार संबंधित लिलाव अधिका-यास/कमेटीस राहतील. त्या शिवाय लिलाव अधिका-याचा / कमेटिचा निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील.
४. उच्चत्तम बोली बोलणारासच फांद्या विकल्या जातील.
५. खरेदी करणारांनी खरेदीची रक्कम त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत जमा करून रितसर पावती हस्तगत करणे **आवश्यक आहे.**
६. रक्कम जमा केल्याशिवाय फांद्या तोडता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.
७. खरेदी करणा-या व्यक्तीनेच खरेदी केलेल्या फांद्या तोडण्याचे काम करावयाचे आहे.
८. शेडच्या ऊंची पासून अंदाजे पांच फुट जास्त ऊंची ठेऊन या पेक्षा जास्त ऊंचीच्या फांद्यांचा भाग तोडता येतील.
९. फांद्या तोडतेवेळी फांद्या मोडून पत्र्याच्या शेडवर पडुन शेडचे नुकसान टाळणे आवश्यक आहे. फांद्या मोडून पत्र्याच्या शेडवर पडुन शेडचे नुकसान झाल्यास संबंदीत खरेदीदाराकडून नुकसान भरपायी भरुन घेण्यात येयील याची नोंद घ्यावी. नुकसान भरपायी रक्कम त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत जमा करून रितसर पावती हस्तगत करणे आवश्यक आहे. नुकसान भरपायी रक्कम जमा केल्याशिवाय फांद्या तोडता येणार नाहीत याची नोंद घ्यावी
१०. या कार्यालयाकडून फांद्या तोडण्याच्या कामात कसल्याही प्रकारची मदत मिळणार नाही.
११. खरेदी केलेली फांद्या जास्तीत जास्त आठ दिवसांचे आत प्रक्षेत्रावरून न्यावे लागतील. नसता योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करण्यात येईल.
१२. लिलाव प्रक्रियेसंबधी लिलाव प्रक्रिया समितीच्या अध्यक्षांचा निर्णय अंतिम ग्राहय धरण्यात येईल. लिलाव प्रक्रियेत भाग घेणा-यांनी याची नोंद घ्यावी.

**जेष्ठ शास्त्रज्ञ**
**संकरित गो पैदास प्रकल्प**
**व.ना.म.कृ.वि.परभणी.**